# पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
# पोलीस उप आयुक्त (गुन्हे )

---

## प्रेसनोट दि. ०९/१०/२०२४.

# कुरीअरच्या डिलीव्हरी वरुन उलगडला खुनाचा गुन्हा

### गुंडा विरोधी पथकाने ०२ आरोपींना निषन्न करुन अवघ्या २४ तासात जि. वाशिम येथुन घेतले ताब्यात

दिनांक ०८/०९/२०२४ रोजी पहाटे सांगवी पोलीस ठाणे हद्दीत जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे च्या पाठीमागील बाजुस एक अनोळखी पुरुष जातीचा इसमाचा डोक्यात मोठा दगड घालुन खुन झाला होता. सपोनि एच.व्ही.माने, पोउनि जगताप, गुंडा विरोधी पथकातील अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळावर जाऊन आजु बाजुचे परीसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज चेक करीत असता पो.हवा. ९५६ गंभीरे व पो.अं. २८१२ मोहिते यांनी सी.सी.टी.व्ही.च्या आधारे दोन इसम मयत इसमा सोबत दुचाकी वरुन ट्रिपल सीट बसुन सांगवी परिसरात दारु घेण्यासाठी आलेले आढळुन आले. त्यातील एका इसमाच्या हातामध्ये पांढऱ्या रंगाची पार्सलची पिशवी होती. सदर इसम दुचाकी वरुन कोठे जात आहे हे सी.सी.टी.व्ही मार्फत पाहिले असता तो कृष्णा चौकातील कुरीयरच्या कंपनीमध्ये गेल्याचे निष्पन्न झाले. सदर कुरिअर कंपनीमध्ये जावुन चौकशी केली असता त्याचे नाव शिव मंगल सिंग वय- ३८ वर्षे, रा. अहोदा तह. राजापुर जिल्हा चित्रकुट राज्य- उत्तरप्रदेश असे असल्याचे समजले व मोबाईल नंबर 7558350133 असा असल्याचा समजला. नमुद मोबाईल नंबरचे विश्लेषण केले असता मोबाईल लोकेशन हे पारनेर येथे असल्याचे समजले. लागलीच गुंडा विरोधी पथकाला वरिष्ठांच्या सुचने नुसार पारनेर जि. अहिल्यानगर येथे रवाना केले. पो.उप-नि जगताप यांना सदरचे मोबाईल लोकेशन अर्धा तास एकाच ठिकाणी थांबले असल्याचे आढळल्याने आरोपी हे जेवण करण्यासाठी थांबले असल्याचा संशय आला. सदर भागातील राजपुत हॉटेल, पांढरी पुल, जि. अहिल्यानगर येथे जाउन सी.सी.टी.व्ही फुटेज चेक केले असता सदर आरोपी हा जेवण करण्यासाठी हॉटेलमध्ये एक तासापुर्वी थांबल्याचे निष्पन्न झाले. लागलीस सी.सी.टी.व्ही. मार्फत आरोपी प्रवास करीत असलेल्या ट्रॅव्हल बस क्रमांक प्राप्त करुन गुंडा विरोधी पथकांने पाठलाग सुरु केला. नमुद आरोपी उत्तर प्रदेश येथे पळुन जाण्याचे प्रयत्नात असताना त्यांना "समृध्दी महामार्ग शेलु टोल प्लाझा, जि. वाशिम" येथे ट्रॅव्हल बस अडवुन शिताफिने ताब्यात घेतले. त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे **१) शिव मंगल सिंग वय- ३८ वर्षे, रा. अहोदा तह. राजापुर जिल्हा चित्रकुट राज्य- उत्तरप्रदेश २) सोमदत्त मनमोहन दुबे वय- २२ वर्षे रा. सदर** असे सांगुन त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी मित्र नामे **पप्पु उर्फ जितेंद्र त्रिपाठी रा. अहोदा, तह. राजापुर जि. चित्रकुट, उत्तर प्रदेश** यास सततच्या होणाऱ्या भांडणाच्या कारणावरुन जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे येथील मागील मोकळ्या जागेत नायलॉन दोरीने गळा आवळुन डोक्यात दगड घालुन खुन केल्याचे कबुल केले आहे.

तरी सदर आरोपींना सांगवी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४२१/२०२४ भारतीय न्याय सहीता (बी.एन.एस) कलम १०३(१), ३(५) मध्ये पुढील कार्यवाही कामी सांगवी पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे सो., मा. सह पोलीस आयुक्त, श्री. शशिकांत महावरकर सो., मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो., मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे सो., मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. विशाल हिरे सो, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही. माने, पोउपनि, अशोक जगताप, स.पो.फौ पी.पी. तापकीर, स.पो.फौ. एस.एन. ठोकळ, स.पो.फौ. व्ही.एच. जगदाळे पो.हवा ४८० जी.डी. चव्हाण, पो.हवा १६०४ एस. डी. चौधरी, पो.हवा ६७५ ए. पी. गायकवाड, पो.हवा ९५६ व्ही.टी. गंभीरे, पो.हवा २९२० जी.एस. मेदगे (तात्रिक विश्लेषण) पो.हवा. १६१० के.पी. वाळंजकर (रेखाचित्रकार), पो.ना १७२९ एस.पी. बाबा (तात्रिक विश्लेषण), पो.ना १७२८ एन.बी. गेंगजे, पो.ना १७८८ व्ही.डी. तेलेवार, पो.शि २८१२ आर. के. मोहीते, पो.शि. २५८७ एस.पी. घारे, पो.शि २८४९ एस.टी. कदम, पो.शि २३८४ टी.ई. शेख, पो.शि. २०८४ व्ही.एन. वेळापुरे यांनी केली आहे.

( संदीप डोईफोडे )
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)